पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ५३**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १३/३/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. २३०८**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/२/२०१८ ते दि.२२/२/२०१८ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/४५३४ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २३०९**

मा.प्रशांत जगताप व मा.सौ.रत्नप्रभा जगताप यांचे दि. ५/३/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २५ ड एस.आर.पी.ग्रुप नं. १ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या क्रिडासंकुलाचे उर्वरित काम करणेसाठी र.रू.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, सीई२२अे५४८/एसजे१०-४४७, प्रभाग क्र. २५ ड, एस.आर.पी.ग्रुप नं. २ येथे बचत गटांकरीता मार्गदर्शन केंद्रे तथा विक्री केंद्रे उभारणे | २५ लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>प्रभाग क्र. २५ ड एस.आर.पी.ग्रुप नं. १ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या क्रिडासंकुलाचे उर्वरित काम करणे | --- | २५ लाख |

**विषय क्र. २३१०**

मा.सुनिल कांबळे, मा.प्रमोद भानगिरे व मा.मारुती तुपे यांचे दि. ५/३/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग (प्राथ) संचलित इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळांकरिता हंगामी शिक्षकांची एकवट करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येते. सदर शिक्षकांची नियुक्ती करताना त्यांस फक्त ६० दिवसांची काम करण्याच्या मुदतीची ऑर्डर देण्यात येते. परंतु वास्तविक पाहता संपुर्ण शैक्षणिक वर्षांकरिता किमान ६ महिन्यांची ऑर्डर हंगामी शिक्षकांना देणे गरजेचे आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

तरी पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग (प्राथ) संचलित इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळांकरिता हंगामी शिक्षकांची एकवट करार पध्दतीने नियुक्ती किमान १८० दिवसांकरिता नियुक्ती ऑर्डर देण्यात यावी.

**विषय क्र. २३११**

मा.सौ.आरती कोंढरे यांचे दि. ७/३/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १८ ब मध्ये प्लास्टिक बॉटल क्रश करण्यासाठी प्लास्टीक बॉटल श्रीडींग मशीन बसविणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, सीई२२अे५४८/एसजे१०-३३७, पान क्र.२३३, अ.क्र.२३७, प्रभाग क्र. १८ ब पोलिस चौकीचे विविध विकास कामे करणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>प्रभाग क्र. १८ ब मध्ये प्लास्टिक बॉटल क्रश करण्यासाठी प्लास्टीक बॉटल श्रीडींग मशीन बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २३१२**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या माहे फेब्रुवारी २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–१/११३६ दि.७/३/२०१८ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २३१३**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१६–१७ या आर्थिक वर्षातील संचलन तूटबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/११३८ दि.२३/२/२०१८ ने पाठविलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

**विषय क्र. २३१४**

बांधकाम विभागाकडील महंमदवाडी, शुक्रवार पेठ, बुधवार पेठ, रास्ता पेठ, एरंडवणा, सदाशिव पेठ विभागाच्या सन २०१७–१८ मध्ये प्रस्ताव मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्तावांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/११७१ दि. १/३/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३६ सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २३१५**

नगरसचिव कार्यालयाकडील सेविका श्रीमती यादव उर्मिला रमाकांत, हुद्दा– शिपाई यांनी परदेशात जाण्यासाठी दि.२/४/२०१८ ते दि.२९/९/२०१८ अखेर हक्काच्या रजेची मागणी केली आहे. त्यांच्या खाती दि.१/४/२०१८ अखेर १०६ दिवस हक्काची रजा शिल्लक असल्याने त्यांना दि.२/४/२०१८ ते दि.१६/७/२०१८ अखेर १०६ दिवस हक्काची रजा व दि.१७/७/२०१८ ते दि.२९/९/२०१८ अखेर ७५ दिवस बिनपगारी रजा मान्य करण्यास मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५७(३)अन्वये मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ८८२८ दि. १/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३१६**

लेखापरिक्षण विभागाकडील श्रीमती रचना अरविंद दवे, हुद्दा–वरिष्ठ लेखापरिक्षक यांना परदेशी जाणेकरीता ४६ दिवस (दि.५/५/२०१८ ते १९/६/२०१८ अखेर) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५७(३) अन्वये हक्काची रजा मंजूर करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांचे जा.क्र. मुलेप/११७३ दि. ५/३/२०१८ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. २३१७**

शहरी गरीब वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत कॅन्सर या गंभीर आजारावरील किमोथेरपी, रिडिएशन, पेट स्कॅन, सी.टी.स्कॅन, एम.आर.आय. तपासणी व शस्त्रक्रिया तसेच शस्त्रक्रियेपुर्वीच्या तपासण्या (Preinveigations) या सर्व वैदयकीय उपचारांसाठी र.रुपये १,००,०००/– या कमाल मर्यादेपर्यंत रुग्णांस १००% हमीपत्रांतर्गत आर्थिक लाभ देणेबाबत मा .अजय खेडेकर , मा.सौ. ज्योती गोसावी ,मा.सौ.मुक्ता जगताप ,मा.सौ.संगिता ठोसर ,मा.सौ.अर्चना पाटील , मा.सौ.अर्चना मुसळे व मा.सौ.लक्ष्मी आंदेकर यांचे दि. १०/१/२०१८ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १७१ दि. १०/१/२०१८ ला अनुसरुन झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २०११ दि. २३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/११४६ दि. ७/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २३१८**

पुणे मनपाच्या विविध हॉस्पीटलमधील लिफ्टची वार्षिक पध्दतीने ऑपरेटिंग कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आयडिया इलेव्हेटर्स कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९७,९०,८२४/- पेक्षा ४.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९३,७४,७१३=९८ पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/११२६ दि.१/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३१९**

पुणे मनपाच्या विविध इमारतीमधील लिफ्टची वार्षिक पध्दतीने ऑपरेटिंग कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आयडिया इलेव्हेटर्स कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७५,३४,८००/- पेक्षा ४.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,१४,५२१/- पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/११२७ दि.१/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२०**

प्रभाग क्र. १८ अ फुलवाला चौक ते सुभानशा दर्गा चौकापर्यंत यु.टी.डब्लू.टी. पध्दतीने काँक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शुभम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,७७५/- पेक्षा ७.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,८२,२९१=३१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११२९ दि. ५/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२१**

नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत काँक्रीट व डांबरी रस्त्याचे वार्षिक देखभाल दुरुस्तीचे विषयक कामे रोड मेंटेनंन्स वाहनाद्वारे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,१००/- पेक्षा ३२.५९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६७,४०,३९३=३१ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (Excluding Drainage Item) फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११३० दि. ५/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२२**

हॉट मिक्स प्लान्ट येथे रॅम्प साठी एम.एस.मध्ये शेड उभे करणे व त्यावर पत्रे बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बांगी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७५,६०,२६३=६० पेक्षा २२.२३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,७९,६१७/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११३१ दि. ५/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२३**

वडगाव जलकेंद्र अखत्यारीतील राजीव गांधी उदयान पंपिंग व आगम मंदिर पंपिंगची देखभाल दुरुस्ती करणे दि.१/१/२०१८ पासून या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.डेक्कन एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,५२,८८०=५० पेक्षा १९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.७०,८३,९२७=८० पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/११३२ दि. ६/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२४**

स्वामी विवेकानंद मध्यवर्ती सुसज्ज ग्रंथालय व ई–लायब्ररी उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार आर.आर.धोत्रे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,६७,१८७/– पेक्षा २७.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून त्यांचे निविदा दरानुसार र.रु. ३८,६४,९११=३५ पैकी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११३४ दि. ७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२५**

प्रभाग क्र. ४१ अ कोंढवा बु.स.नं.१५ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर मैदानी खेळ व प्रशिक्षण केंद्र उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.महादेव सोपान गोते ॲन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५६,२४,२१३/– पेक्षा २.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५५,०५,५४२=१० पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/११३५ दि. ७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२६**

प्रभाग क्र. २८ क मध्ये श्रीमती इंदुमती मनीलाल खन्ना दवाखाना येथे वरचा मजला वाढविणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.दि रायकॉन कस्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४५,६५,६९५/– पेक्षा १३.८१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,३४,७१५=९५ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११३७ दि.७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३२७**

प्रभाग क्र. ३८ ड मधील कात्रज स.नं.२३/२ (पार्ट) २७/१ (पार्ट) येथील ॲमेनिटी स्पेसवर बांधलेल्या डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जलतरण तलाव व क्रिडा संकुलाचे उर्वरित अपुर्ण कामे पुर्ण करणे (फेज–४) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राजेश संपतराव कदम यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५७,९०,०१७/– पेक्षा १८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४७,४७,८१३=९४ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११३८ दि. ७/३/२०१८ चे पत्र.

## एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्र. २३२८**

पुणे मनपाच्या विविध ठिक़ाणची संगीत कारंजे व मल्टीमिडीया शो चे वार्षिक पध्दतीने ऑपरेटिंगची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.श्री.अथर्वरथी इलेक्ट्रीकल्स् यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.३०,१३,९२०/– पेक्षा २.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,३८,५७२/– पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी त्याप्रमाणे करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/११२५ दि.१/३/२०१८ चे पत्र.

## टेंडर्स न मागविता ५(२)(२) अन्वये प्रकरणे

**विषय क्र. २३२९**

मा. आ. श्री. योगेश टिळेकर, विधानसभा सदस्य, हडपसर विधानसभा मतदार संघ यांच्या सन २०१७–१८ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून मुंढवा परिसरामध्ये नवीन रुग्णवाहिका (सखाराम कुंडलिक कोंद्रे दवाखाना) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.फोर्स मोटर्स लि., पुणे या उत्पादक कंपनीकडून खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११२३ दि.२८/२/२०१८ चे पत्र.

१. मा. आ. श्री. योगेश टिळेकर, विधानसभा सदस्य, हडपसर विधानसभा मतदार संघ यांच्या सन २०१७-१८ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून मुंढवा परिसरामध्ये नवीन रुग्णवाहिका (सखाराम कुंडलिक कोंद्रे दवाखाना) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.फोर्स मोटर्स लि., पुणे या उत्पादक कंपनीकडून Traveller Ambulance, Seating 13+D BSIV, 3350 MM WB, with Power Steering & Air-Conditioned या मॉडेलच्या १ नग रुग्णवाहिकेकरीता रक्कम रु.११,३२,७०२=९६ पर्यंत जीएसटी करांसह त्यांचे दरपत्रकातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस व रुग्णवाहिका खरेदी कामी होणारे देयक मे.फोर्स मोटर्स लि., पुणे यांचे नावे ऑनलाईन पध्दतीने आरटीजीएस याद्वारे आदा करणेस.

२. मे.फोर्स मोटर्स लि., पुणे यांचे अधिकृत विक्रेते मे.सिध्दार्थ मोटर्स, कासारवाडी, पुणे यांचेकडून नामफलक व आरटीओ रजिस्ट्रेशनचे काम रक्कम रु.८,०००/- पर्यंत जीएसटी करांसह त्यांचे दरपत्रकातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता करुन घेणेस व सदर कामी होणारे देयक मे.सिध्दार्थ मोटर्स, कासारवाडी, पुणे यांचे नावे ऑनलाईन पध्दतीने आरटीजीएसद्वारे आदा करणेस.

३. मा. आ. श्री. योगेश टिळेकर, विधानसभा सदस्य, हडपसर विधानसभा मतदार संघ यांच्या सन २०१७-१८ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून मुंढवा परिसरामध्ये नवीन रुग्णवाहिका (सखाराम कुंडलिक कोंद्रे दवाखाना) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.फोर्स मोटर्स लि., पुणे या उत्पादक कंपनीकडून Traveller Ambulance, Seating 13+D BSIV, 3350 MM WB, with Power Steering & Air-Conditioned या मॉडेलच्या १ नग रुग्णवाहिकेकरीता रक्कम रु.११,३२,७०२=९६ पर्यंत जीएसटी करांसह त्यांचे दरपत्रकातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस व मे.फोर्स मोटर्स लि., पुणे यांचे अधिकृत विक्रेते मे.सिध्दार्थ मोटर्स, कासारवाडी, पुणे यांचेकडून नामफलक व आरटीओ रजिस्ट्रेशनचे काम रक्कम रु.८,०००/- पर्यंत जीएसटी करांसह त्यांचे दरपत्रकातील अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता करुन घेणेस असे एकूण रक्कम रु.११,४०,७०२=९६ पर्यंत खर्च करणेस.

**विषय क्र. २३३०**

मा.महापौर, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभागृह नेते, मा.गटनेते भा.ज.पा.,मा.गटनेते, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, मा.अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, यांचे कार्यालयात चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले होते. तसेच स्थायी समिती, शहर सुधारणा समिती, महिला व बाल कल्याण समिती, विधी समिती, ऑडिट उप समिती सभेप्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविणेत आले होते. त्याप्रित्यर्थ संबंधित बिलधारकाने बिले सादर केली असून सदरची बिले संबंधितास अदा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील शेड्युल डी चॅप्टर ५ मधील कलम २(२)अन्वये पश्चात मान्यता मिळणेस व शेड्युल डी चॅप्टर ५ मधील कलम (१)(ब)नुसार करारनामा न करता संबंधित अर्थशिर्षकावर बिले खर्ची टाकून संबंधितांस अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नस/११२८ दि. ३/३/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २३३१**

२४ बाय ७ समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत यापूर्वी मनपाकडून २८१८ कोंटींची काढण्यात आलेली निविदेच्या एस्टिमेटमध्ये तब्बल र.रू.२९० कोटी रूपयांची वाढ करणा-या या निविदेसाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारास काळया यादीत टाकण्यात यावे व प्रकल्प सल्लागाराविरूध्द कडक कारवाई करण्याबाबत मा.अविनाश बागवे, मा.प्रिया गदादे, मा.रविंद्र धंगेकर, मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.साईनाथ बाबर यांचे दि.१५/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३२१ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/पापु/८३४ दि. १६/१/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२०/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३२**

वडगाव स.नं.५७ येथे कचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या ताब्यात आलेल्या जागेवर मॉन्सून शेड उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६९,१३,९४५/- पेक्षा २८.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,६७,६६९=४८ (सर्व करांसहित) रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१०६३ दि.२१/२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३३**

पुणे महानगरपालिका हद्दीतील रस्ता दुभाजक, वाहतुक बेटे, उद्याने यांचे सुशोभिकरण, देखभाल, दुरूस्ती व वृक्षारोपण इ. कामाकरिता एक्सप्रेशन ऑफ इंट्रेस्ट (II) अंतर्गत मा. बी.ओ.टी समिती मध्ये मान्य झालेल्या प्रस्तावास मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र.७, ८ व ९ अन्वये खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/८०७ दि. १५/१/२०१८ चे पत्र.

१) मा. बी.ओ. टी समितीने प्रायोजकांच्या प्रस्तावावर घेतलेल्या निणर्यानुसार कार्यवाही करणेस,

२) मा. बी.ओ.टी समितीने मान्य केलेल्या प्रायोजकांच्या प्रस्तावास मान्यता व कामांचे कार्यादेश (वर्कऑर्डर) देणेस,
३) एक्सप्रशेन ऑफ इंट्रेस्ट मधील अटी, शर्तीस व त्यानुसार सुरक्षा अनामत रक्कम स्विकारणेस,

अ. वाहतुक बेट – प्रत्येक ५० चौ.मी क्षेत्रास र.रू ५०,०००/-
ब. रस्तादुभाजक – प्रत्येक ५०० मी . लांबीस र.रू २५,०००/-
क. उद्याने – प्रत्येक १००० चौ.मी क्षेत्रास र.रू १,००,०००/-
ड. वृक्षारोपन – प्रति वृक्ष र.रू ५००/- (वृक्ष संरक्षक पिजंऱ्यासह)
– प्रति चौ.मी क्षेत्रास र.रू ५००/- (वृक्षारोपणासह सुशोभिकरण)
इ. मोठया कुंडया – प्रति कुंडी र.रू २५०/-

४) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या कामांबाबत प्रायोजकांसमवेत करारनामा करणेस,
५) प्रायोजकास खालीलप्रमाणे त्याचा नावाचा नामफलक लावण्यास परवानगी देण्यात येणार आहे.
अ)वाहतूक बेटे :- प्रत्येक ५० चौ.मी.क्षेत्रास १५ x १८ इंच आकाराचा नामफलक
ब)रस्ता दुभाजक :- प्रत्येक १०० मीटर लांबीस १५ x १८ इंच आकाराचा नामफलक

(प्रायोजकांच्या प्रत्येकी ३ नामफलकानंतर उद्यान विभाग,पुणे महानगरपालिकेचा एक नामफलक व त्यावर पर्यावरणाचा संदेश देणारे वाक्य असणे बंधनकारक असणार आहे.)

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३४**

पुणे शहरातील सर्व गोठेधारकांना मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याकरीता दि.३१ डिसेंबर २०१८ पर्यंत मुदत देणे आवश्यक आहे व दरम्यानच्या कालावधीमध्ये गोठेधारकांना प्लॉट देणेसाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती अथवा धोरणास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९२१ दि.३०/१/२०१८ चे पत्र.

१.गोठेधारकांकडून खाली नमुद केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणा-या गोठेधारकास क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०१५ च्या सर्व्हे नुसार जनावरांच्या संख्येप्रमाणे (१० मोठया जनावरास एक प्लॉट अंदाजे २५०० स्वे.फुट) या तत्वावर प्लॉट देणेस,
२. सदर प्लॉटचे शासकीय मुल्याकंनानुसार भोगवटा मुल्य स्विकारण्यास.
३. मध्यवर्ती शहरातील गोठयांच्या संख्ये इतके प्लॉट राखून ठेवून उर्वरित प्लॉट उपनगरातील पात्र गोठेधारकांना वाटप करणेस,
४. मध्यवर्ती शहरातील गोठे मुंढवा-केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याच्या दृष्टीने शहरातील गोठे धारकांना दि.३१/१२/२०१८ ही गोठे स्थलांतरीत करण्याकरिता अंतिम तारीख निश्चित करणेस,
५.गोठे स्थलांतरासाठी खालीलप्रमाणे गोठेधारकांची कागदपत्रे ग्राहय धरण्यास.
अ. मा.आरोग्य अधिकारी पुणे महानगरपालिका यांच्या नावे अर्ज.
ब. रेशनींग कार्ड (शिधापत्रिका) ची प्रत.
क. सदर जागेवर सदयःस्थितीत गोठा असल्याचा दिनांक व वेळेसह फोटो व पुणे महानगरपालिकेकडून गोठ्यावर केलेल्या २०१५ पुर्वीचे कारवाईचे कागदपत्रे उदा.मनपा कोर्टातील खटला,सार्वजनिक ठिकाणी घाण केली यासाठी प्रशासकिय शुल्क भरल्याची पावती इ.
ड. महाराष्ट्र शासनाकडील जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांचेकडून परवाना अथवा परवाना घेण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

इ. संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाकडील आरोग्य निरीक्षक,वरिष्ठ निरीक्षक, प्रमुख आरोग्य निरिक्षक,क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी, महा.सहा.आयुक्त व क्षेत्रिय उपायुक्त यांच्या स्पष्ट अभिप्रायासह स्वाक्षरीचे गोठ्यासाठी जागा देणेबाबत शिफारसपत्र.

६. सरकारी जमिनीवर (नदीपात्र,रस्ता,एसआरए स्कीम इ.) असलेल्या गोठेधारकांचे देखील उपरोक्त अटी व शर्तींची पुर्तता केल्यास मुंढवा-केशवनगर येथे गोठयांसाठी पर्यायी जागा दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने देण्यास.

७. दि.३१/१२/२०१८ पर्यंत मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत न होणा-या गोठे धारकांवर कारवाई करुन तेथील गोठे व्यवसाय बंद करण्यास.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३५**

मा.सौ.सुजाता शेट्टी व मा.योगेश समेळ यांचे दि. २/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १६ क जुना कसबा पेठ ते जुना बाजार उड्डाणपूल रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) ची तरतुद आहे. सदर काम होत नसून सदरचे रक्कम खालीलप्रमाणे वर्गीकरण करुन रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) कमी व रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) अधिक प्रभाग क्र. १६(क)/(अ)/(ब)/(ड) मधील भागात विविध विकास कामे करणे

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३६**

मा.योगेश ससाणे व मा.मारुती (आबा) तुपे यांचे दि. ४/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, बजेट कोड क्र. एफई६१अे१११, १.हांडेवाडी (ससाणेनगर)येथे उडडाणपूल बांधणे. | १ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १) प्रभाग क्र.२३ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत केबल्स भूमिगत करणे | --- | ५० लाख |
| २) प्रभाग क्र.२३ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३७**

मा.सौ.वैशाली बनकर व मा.योगेश ससाणे यांचे दि. ४/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, सार्वजनिक वाहतुक सुधारणा व विशेष प्रकल्प १/१ विभागामार्फत करावयाची कामे, बजेट कोड क्र. एफई६१अे१११, हांडेवाडी (ससाणेनगर)येथे उडडाणपूल बांधणे. | १ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र.२३ ब मध्ये कै.रामचंद्र बनकर शैक्षणिक व क्रिडा संकुलामध्ये विविध कामे करणे | --- | ५० लाख |
| २)प्रभाग क्र.२३ ब मध्ये कै.रामचंद्र बनकर क्रिडा संकुलामध्ये विद्युतची कामे करणे | --- | ३० लाख |
| ३) प्रभाग क्र.२३ ब मध्ये विविध ठिकाणी विद्युत तारांचे धोकादायक पोल हटविणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.२३ ब मध्ये जेट मशिनने ड्रेनेज लाईन साफ करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३८**

अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या वर्ग १ ते ४ संवर्गातील सर्व पदांवरील म.न.पा. सेवकांचे वेतनामधून मासिक सी.एच.एस.वर्गणी(मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनामधून मासिक सी.एच.एस. वर्गणी (मूळ निवृत्ती वेतन+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस, व त्यानुसार कार्यवाही करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९७४ दि.५/२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३३९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४३ अन्वये पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी सार्वजनिक वाहनतळ धोरणास (पार्किंग पॉलिसीस) मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/९५८ दि.१/२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २३४०**

कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत महापालिका सेवकांना एक अपत्यावर कुटूंब नियोजन केल्या प्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणे ऐवजी रोख रक्कम स्वरुपात एकदाच बक्षिस (One time reward) देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/१०४७ दि.२०/२/२०१८ चे पत्र.

१)मा.महापालिका सभेचे ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार संबंधित महानगरपालिका अधिकारी/सेवकांना देण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करणेस, त्यानुसार वेतन फेरनिश्चितीकरण व आवश्यक ती कार्यवाही करणेस

२) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे मा.स्थायी समितीचे मंजुरीने लाडकी लेक दत्तक योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये एका मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास र.रुपये ५० हजार पर्यंत राष्ट्रीयकृत बँकेत मुलीच्या नावे गुंतविण्यात येतात. त्या योजनेप्रमाणे कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत पुणे महापालिका अधिकारी/सेवकांनी एका अपत्यावर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याप्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणेऐवजी, संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना र.रुपये ५० हजार एकदाच बक्षिस (One time reward) स्वरुपात दि. १८/१२/१९९८ पासून मा.महापालिका सभा ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ चे मंजुरीमधील अट क्र. २ व ४ च्या अधीन देणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२७/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. २३४१**

पुणे महानगरपालिका,समाज विकास विभाग मार्फत युवक कल्याणकारी योजना अंतर्गत हॅलो माय फ्रेंड उपक्रम सन २०१७–२०१८ या आर्थिक वर्षामध्ये सुरू करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुसवि/४२४ दि.७/१०/२०१८ चे पत्रावर झालेला पक्षनेता सभेचा दि.७/२/२०१८ रोजीचा निर्णय विचारासाठी.

१. सन २०१७–२०१८ या आर्थिक वर्षाकरीता हॅलो माय फ्रेंड उपक्रम राबविणेस.
२. हॅलो माय फ्रेंड उपक्रमा करीता सन २०१७–२०१८ आर्थिक वर्षात ४ क युवक कल्याणकारी योजना निधी अंतर्गत FE14D125 (हॅलो माय फ्रेड योजना राबविणे) या अर्थशिर्षकावरील र. रू. ६ लाख तरतूदीमधून खर्च करणेस.
३. सदर उपक्रम राबविणेकरीता वर्गीकरणाद्वारे सिस्टिम कार्यान्वित करणे, समुपदेशिका मानधन बील तसेच टेलिफोन बील, जाहिरात व इतर तद्नुषंगिक बाबींसाठी खर्च इ. करीता अधिक रक्कम रू. ४ लाख तरतूद उपलब्ध करणेस.
४. सदर उपक्रम पुणे शहरात राबविणेकरीता मा. मुख्य सभेची मान्यता मिळाल्यानंतर खालीलप्रमाणे हॅलो माय फ्रेंड उपक्रम राबविणेस.

अ. पुणे महानगरपालिका, हॅलो माय फ्रेंड उपक्रम मंगळवार पेठ, पुणे ११ येथील कमला नेहरू हॉस्पिटल या ठिकाणी सुरू करणे.

ब. हॅलो माय फ्रेंड उपक्रमा करीता टोल फ्री क्रमांक द्वारे समुपदेशन करणे करीता आवश्यक सॉफ्टवेअर तयार करून घेणे. या पोटी होणाऱ्या खर्चास. या सॉफ्टवेअर मार्फत बल्क एसएमएस पाठविणे, समुपदेशन कामी दुरध्वनीवर झालेली चर्चा रेकॉर्ड करणे.

क. हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत समुपदेशन करणे कामी लोकल कॉल करणे, एसटीडी कॉल करणे, एसएमएस करणे या करीता होणारा खर्च करणे.

ड. हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत समुपदेशन करणे करीता दोन समुपदेशक नेमणे व त्यांच्या मानधना पोटी होणारा खर्च करणे.

इ. हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन कार्यक्रम (करिअर गाईडन्स, कौटुंबिक समस्या, मानसिक ताणतणाव, वैयक्तिक समस्या इ.) आयोजित करणे करीता येणारा खर्च, जाहिरात-वर्तमानपत्र, आकाशवाणी, रेडीओ मिर्ची, छापील साहित्य व इतर तद्नुषंगिक बाबींसाठी होणाऱ्या खर्चास.

**विषय क्र. २३४२**

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या योजनांबाबत विधवा महिलांच्या अनुदानात र.रुपये ५,०००/- वाढ करुन र.रुपये १५,०००/- अनुदान देण्यात यावे व उर्वरित रक्कम शहरी गरीब आरोग्य योजनेकडे वर्ग करण्यात यावी तसेच मआ/सविवि/१९९ दि.२१/७/२०१७ चा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत यावा याबाबत झालेला पक्षनेते सभा दि. ७/२/२०१८ चा निर्णय विचारासाठी.

**विषय क्र. २३४३**

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील कामांसाठी नियुक्त तज्ञ सल्लागारांचे पॅनेल रद्द करुन निविदा पध्दतीने सल्लागारांची नियुक्ती करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/पापु/११३३ दि.६/३/२०१८ चे पत्र.

१)मा.स्थायी समिती ठराव क्र.९२ दि.२६/४/२०११ अन्वये गठीत करण्यात आलेले तज्ञ सल्लागारांचे पॅनेल आणि दर रद्द करणेस

२) पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाकडील यापुढील प्रकल्पांकरीता सल्लागार नियुक्ती करीता केंद्रीय दक्षता आयोगाकडील मार्गदर्शक सुचनांचा अंतर्भाव करुन स्वतंत्रपणे निविदा प्रक्रिया राबविणेस

३) निविदेमध्ये प्राप्त होणाऱ्या न्युनतम दराने कामाचा मुशाहिरा नियुक्त सल्लागारात आदा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

**विषय क्र. २३४४**

टेंडर क्र. ०६ किटक सन २०१७-१८ सालासाठी आरोग्य खाते किटक प्रतिबंधक विभागासाठी बायफेंथ्रिन (१०%WP) पुरविणे कामासाठी टेंडर रक्कम म्हणजेच ७९,९४,०००/-रुपये अधिक १९,९८,५००/- रुपये असे एकूण ९९,९२,५००/-(अक्षरी नव्यानव लाख ब्याण्णव हजार पाचशे रूपये ) मे.लक्ष्मी केमिकल्स लाईम अॅन्ड पेस्ट कंट्रोल, पुणे यांचे कडून जुन्या दराने म्हणजेच प्रति किलो ३,९९७/- रुपये (सर्व करांसह)(अक्षरी रुपये तीन हजार नऊशे सत्याण्णव) प्रमाणे, जादा एकुण ५०० किलो औषधाचे रक्कम रुपये १९,९८,५००/- (अक्षरी रुपये एकोणीस लाख आठ्यानव हजार पाचशे) पर्यंत वाढीव खरेदी करण्यास, त्यासाठी त्यांचेशी वाढीव करारनामा करणेस व त्यापोटी होणारे जादाचे बिल त्यांना अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/११४१ दि.७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३४५**

टेंडर क्र. ०९ किटक सन २०१७-१८ सालासाठी आरोग्य खाते किटक प्रतिबंधक विभागासाठी सायफेनोथ्रिन (५% EC) पुरविणे या कामासाठी टेंडर रक्कम म्हणजेच २४,२४,६००/-रुपये अधिक १२,१२,३००/- रुपये असे एकूण ३६,३६,९००/-(अक्षरी छत्तीस लाख छत्तीस हजार नऊशे रूपये फक्त) मे.प्रोटेक्ट, मुंबई यांचे कडून जुन्या दराने म्हणजेच प्रति लिटर १,३४७/- रुपये (सर्व करांसह)(अक्षरी रुपये एक हजार तीनशे सत्तेचाळीस फक्त) प्रमाणे, जादा एकुण ९०० लि. औषधाचे रक्कम रुपये १२,१२,३००/- (अक्षरी रुपये बारा लाख बारा हजार तीनशे फक्त) पर्यंत वाढीव खरेदी करण्यास, त्यासाठी त्यांचेशी वाढीव करारनामा करणेस व त्यापोटी होणारे जादाचे बिल त्यांना अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/११४२ दि.७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३४६**

टेंडर क्र. ०७ किटक सन २०१७-१८ सालासाठी आरोग्य खाते किटक प्रतिबंधक विभागासाठी डायफ्लुबेंझेरॉन (२५% WP) पुरविणे या कामासाठी टेंडर रक्कम म्हणजेच ३७,८५,०००/-रुपये अधिक ११,७३,३५०/- रुपये असे एकूण ४९,५८,३५०/-(अक्षरी एकोणपन्नास लाख अठ्ठावन हजार तीनशे पन्नास रूपये फक्त) मे.एस.के.सेल्स, पुणे यांचे कडून जुन्या दराने म्हणजेच प्रति किलो ३,७८५/- रुपये (सर्व करांसह)(अक्षरी रुपये तीन हजार सातशे पंच्याऐंशी फक्त) प्रमाणे, जादा एकुण ३१० किलो औषधाचे रक्कम रुपये ११,७३,३५०/- (अक्षरी रुपये अकरा लाख त्र्याहत्तर हजार तीनशे पन्नास फक्त) पर्यंत वाढीव खरेदी करण्यास, त्यासाठी त्यांचेशी वाढीव करारनामा करणेस व त्यापोटी होणारे जादाचे बिल त्यांना अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/११४३ दि.७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३४७**

टेंडर क्र. १३ किटक सन २०१७-१८ सालासाठी आरोग्य खाते किटक प्रतिबंधक विभागासाठी ईमिडाक्लोप्रिड ०.५ RB पुरविणे या कामासाठी टेंडर रक्कम म्हणजेच २४,४५,८००/-रुपये अधिक १२,२२,९००/- रुपये असे एकूण ३६,६८,७००/-(अक्षरी छत्तीस लाख अडुसष्ट हजार सातशे रूपये फक्त) मे.प्रोटेक्ट, मुंबई यांचे कडून जुन्या दराने म्हणजेच प्रति किलो १,७४७/- रुपये (सर्व करांसह)(अक्षरी रुपये एक हजार सातशे सत्तेचाळीस फक्त) प्रमाणे, जादा एकुण ७०० किलो औषधाचे रक्कम रुपये १२,२२,९००/- (अक्षरी रुपये बारा लाख बावीस हजार नऊशे फक्त) पर्यंत वाढीव खरेदी करण्यास, त्यासाठी त्यांचेशी वाढीव करारनामा करणेस व त्यापोटी होणारे जादाचे बिल त्यांना अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/११४४ दि.७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३४८**

टेंडर क्र. ०८ किटक सन २०१७-१८ सालासाठी आरोग्य खाते किटक प्रतिबंधक विभागासाठी पायरीप्रॉक्सीफेन ०.५G पुरविणे या कामासाठी टेंडर रक्कम म्हणजेच ९८,८८,०००/-रुपये अधिक ३२,९६,०००/- रुपये असे एकूण १,३१,८४,०००/-(अक्षरी एक कोटी एकतीस लाख चौ-याऐंशी हजार रूपये फक्त) मे.प्रोटेक्ट, मुंबई यांचे कडून जुन्या दराने म्हणजेच प्रति किलो ३,२९६/- रुपये (सर्व करांसह)(अक्षरी रुपये तीन हजार दोनशे शहांण्णव फक्त) प्रमाणे, जादा एकुण १००० किलो औषधाचे रक्कम रुपये ३२,९६,०००/- (अक्षरी रुपये बत्तीस लाख शहांण्णव हजार फक्त) पर्यंत वाढीव खरेदी करण्यास, त्यासाठी त्यांचेशी वाढीव करारनामा करणेस व त्यापोटी होणारे जादाचे बिल त्यांना अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/११४५ दि.७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३४९**

ऑडीट उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.८९५१ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २३५०**

अपिल उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.८९५२ दि. ८/३/२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**